# बृहन्मुंबई महानगरपालिका

## जाहिरात

बृहन्मुंबई महानगरपालिकेतील विविध खात्यांच्या आस्थापनेवरील रु.5200-20200 अधिक ग्रेडपे रु.1900 अधिक अनुज्ञेय भत्ते या वेतनश्रेणीतील कनिष्ठ लघुलेखक (इंग्रजी-नि-मराठी) या संवर्गातील मागासवर्गीयांची तसेच खुल्या प्रवर्गातील रिक्त पदे भरण्यासाठी निवडयादी तयार करावयाची असल्याने खाली नमूद केलेली विहित अर्हता व अटींची पूर्तता करणा-या इच्छुक उमेदवारांनी विहित नमुन्यातील वैयक्तिक माहितीपत्र (BIO-DATA) आणि आवश्यक त्या सर्व प्रमाणपत्रांच्या मूळ प्रतींसह खालील नमूद केलेल्या ठिकाणी व दिनांकास भरती प्रक्रीयेसाठी उपस्थित रहावे.

दि.11.10.08 रोजी कनिष्ठ लघुलेखक (इंग्रजी व मराठी) या पदासाठी देण्यात आलेल्या जाहिरातीच्या अनुषंगाने अर्ज केलेल्या पण व्यवसायिक चाचणी परीक्षेत अनुत्तीर्ण झालेले इच्छूक उमेदवार जर ते या जाहिरातीच्या अनुषंगाने विहित अर्हता (उदा. वयोमर्यादा) धारण करीत असल्यास त्यांनी जाहिरातीच्या अनुषंगाने अर्ज करणे आवश्यक राहील.

**सामाजिक व समांतर आरक्षणाचा तपशील**

| पदाचे नाव - कनिष्ठ लघुलेखक (इंग्रजी-नि-मराठी) | | सामाजिक आरक्षणांतर्गत पदे | | | | | | | | एकूण मागासवर्गीय | खुला प्रवर्ग | एकूण रिक्त पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अजा जा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | इमाव | विमाप्र | | | |
| रिक्त पदे | | 23 | 18 | 8 | 6 | 9 | 4 | 27 | 4 | 99 | 1 | 100 |
| समांतर आरक्षणांतर्गत पदे | | | | | | | | | | | | |
| अ | महिला (30%) | 7 | 5 | 2 | 2 | 3 | 2 | 8 | 1 | 30 | -- | 30 |
| ब | माजी सैनिक (15%) | 3 | 3 | 1 | 1 | 1 | 1 | 4 | 1 | 15 | -- | 15 |
| क | प्रकल्पग्रस्त (5%) | 1 | 1 | 1 | -- | 1 | -- | 1 | -- | 5 | -- | 5 |
| ड | भूकंपग्रस्त (2%) | 1 | -- | -- | -- | -- | -- | 1 | -- | 2 | -- | 2 |
| इ | खेळाडू (5%) | 1 | 1 | 1 | -- | 1 | -- | 1 | -- | 5 | -- | 5 |
| | सर्वसाधारण | 9 | 8 | 3 | 3 | 3 | -- | 11 | 2 | 39 | 1 | 40 |

| | | | |
|---|---|---|---|
| ई | अपंगांसाठी आरक्षित पदे | अंशत: अंध(PS) -1 , अंशत: कर्णबधीर(PD)-1 अस्थिव्यंग(OL/BL)-1 | 3 |
| | एकूण रिक्त पदे | | 100 |

## समांतर आरक्षणाबाबत तपशील:

अ) **महिलांसाठी** : महिलांची आरक्षित पदे महाराष्ट्र शासन, महिला व बालविकास विभाग शासन निर्णय क्र.82/2001/मसेआ-2000/प्र.क्र.415/का-2 दि.25 मे 2001 मध्ये विहित केलेल्या अटी व शर्तीनुसार भरण्यात येतील. तथापि, एखादया प्रवर्गात त्या प्रमाणात महिला उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदरची पदे त्या प्रवर्गाच्या पुरुष उमेदवारांमधून भरण्यात येतील.

ब) **माजी सैनिकांसाठी** : महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्र.एसआरव्ही-1097/प्र.क्र.31/98/16 अ दि.16.03.1999 मधील तरतुदीनुसार माजी सैनिकांसाठी 15% इतके समांतर आरक्षण ठेवण्यात आले आहे.

क) **प्रकल्पग्रस्तांसाठी** : सन 2001 चा महाराष्ट्र अधिनियम क्र.11, महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, 1999 नुसार शासनाने विहित केलेले नियम आणि बृहन्मुंबई महानगरपालिका ठराव क्र.10 दि.03.04.2008 अन्वये मंजूर झालेली मार्गदर्शक तत्वे यांनुसार ज्या प्रकल्पग्रस्तांची जमीन मुंबई महानगरपालिकेच्या प्रकल्पांसाठी संपादित केली आहे अशा प्रकल्पग्रस्तांसाठीची आरक्षित पदे भरण्यात येतील.

ड) **भूकंपग्रस्तांसाठी**: भूकंपग्रस्तांची आरक्षित पदे महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.भूकंप-1008/प्र.क्र.145/2008/16-अ दि.27 ऑक्टोबर 2008 आणि शासन निर्णय क्र.भूकंप-1009/प्र.क्र.207/2009/16-अ दि.27 ऑगस्ट 2009 मध्ये विहित केलेल्या अटी व शर्तीनुसार स्वतंत्रपणे भरण्यात येतील.

इ) **खेळाडूंसाठी** : खेळाडूंची आरक्षित पदे महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्र.राक्रीधो- 2002/प्र.क्र.68/क्रीयुसे-2 दि.30 एप्रिल 2005 मध्ये विहित केलेल्या अटी व शर्तीनुसार भरण्यात येतील.

ई) **अपंगांसाठी** : अपंगांची रिक्त पदे शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णय / परिपत्रकानुसार भरण्यात येतील. तसेच महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.न्याय-2007/स.न्या./प्र.क्र.103(भाग-3)/16-अ दि.19 ऑक्टोबर 2007 अन्वये अपंगांची वरील रिक्त पदे सामाजिक प्रवर्गात न दर्शविता स्वतंत्रपणे दर्शविण्यात आली आहेत.

स्वातंत्र्यसैनिक व त्यांचे नामनिर्देशित : महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.सीएनएस-1004/802/प्र.क्र.42/04/16-अ दि.06.08.2004 मधील निदेशानुसार स्वातंत्र्यसैनिक / त्यांचे नामनिर्देशित यांना शासनाच्या अटी व सवलती विचारात घेऊन महापालिका सेवेत समाविष्ट करुन घेण्यात येईल.

## विहित अर्हता :

1) उमेदवार माध्यमिक शालांत किंवा तत्सम प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

2) उमेदवाराने शालांत किंवा तत्सम परीक्षेत प्रत्येकी 100 गुणांचे मराठी व इंग्रजी हे विषय घेतलेले असावेत.

3) टंकलेखन व लघुलेखनातील खालीलप्रमाणे किमान आवश्यक गती-

| इंग्रजी | मराठी |
|---|---|
| लघुलेखन- 80 श.प्र.मि. | लघुलेखन – 80 श.प्र.मि. |
| टंकलेखन- 40 श.प्र.मि. (खुल्या प्रवर्गासाठी) | टंकलेखन – 30 श.प्र.मि. |
| टंकलेखन- 30 श.प्र.मि. (मागासवर्गीयांसाठी) | |

(विहित गतीचे शासनाचे प्रमाणपत्र आवश्यक)

अर्हताप्राप्त उमेदवारांची इंग्रजी/मराठी लघुलेखन व इंग्रजी /मराठी टंकलेखनाची व्यावसायिक चाचणी संगणकावर घेण्यात येईल.

4) संगणकविषयक ज्ञान : उमेदवार डीओईएसीसी सोसायटीचे 'सीसीसी' किंवा 'ओ' स्तर किंवा 'ए स्तर' किंवा 'बी स्तर' किंवा 'सी स्तर' या स्तरावरील प्रमाणपत्रधारक किंवा महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रिक शिक्षण मंडळाचे एम.एस. - सी.आय.टी. किंवा जी.ई.सी.टी. चे प्रमाणपत्रधारक असावा किंवा महाराष्ट्र शासन या संदर्भात वेळोवेळी आदेश काढून निश्चित करेल अशी परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक

आहे. तथापि, नियुक्तीच्या वेळी उमेदवाराजवळ सदर प्रमाणपत्र नसल्यास त्याने/तिने शासनाने विहित केलेली एम.एस.सी.आय.टी ही परीक्षा नेमणुकीच्या दिनांकापासून 2 वर्षांच्या आत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे, अन्यथा त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.

5) वयोमर्यादा – उमेदवार बृहन्मुंबई महानगरपालिका सेवेत नसल्यास त्याचे वय दि. 01.04.2010 रोजी

अ) खुल्या प्रवर्गासाठी 18 ते 33 वर्षे दरम्यान

ब) मागास प्रवर्गासाठी 18 ते 38 वर्षे दरम्यान

क) अपंगांसाठी व माजी सैनिकांसाठी 18 ते जास्तीत जास्त 45 वर्षे दरम्यान. माजी सैनिकांच्या बाबतीत सशस्त्र सेनादलातील 6 महिन्यापेक्षा कमी नाही एवढी सलग सेवा झालेल्या उमेदवारांच्या वयातून सशस्त्र सेनादलातील सेवा कालावधी अधिक 3 वर्षे वजा करण्यात येतील.

ड) स्वातंत्र्यसैनिक व त्यांच्या नामनिर्देशितांच्या बाबतीत खुल्या प्रवर्गासाठी 18 ते 38 वर्षे दरम्यान आणि मागासवर्गीयांसाठी 18 ते 43 वर्षे दरम्यान असले पाहिजे.

इ) शासन निर्णयानुसार खेळाडूंची गुणवत्ता व पात्रता विचारात घेता उपरोक्त पदासाठी असलेल्या वयोमर्यादेत 5 वर्षांपर्यंत वयाची अट शिथिल करण्यात येईल.

उमेदवार अगोदरच बृहन्मुंबई महानगरपालिका सेवेत असल्यास त्याच्यासाठी कमाल वयोमर्यादा नाही.

**निवडीचे निकष व कार्यपध्दती** – निवड प्रक्रियेमध्ये उमेदवाराच्या शैक्षणिक/व्यावसायिक तसेच आवश्यक त्या सर्व प्रमाणपत्रांची पडताळणी, मराठी व इंग्रजी लघुलेखन व टंकलेखनाच्या व्यावसायिक चाचणीचा समावेश असेल. भरतीच्या दिवशी उमेदवाराच्या आवश्यक त्या सर्व प्रमाणपत्रांची पडताळणी करण्यात येईल. सर्व दृष्टीने परिपूर्ण कागदपत्रे सादर केलेल्या अर्हताप्राप्त उमेदवारांची मराठी व इंग्रजी लघुलेखन आणि मराठी व इंग्रजी टंकलेखनाची व्यावसायिक चाचणी संगणकावर नंतर घेण्यात येईल. व्यावसायिक चाचणीत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांच्या शालांत वा तत्सम परिक्षेतील गुणांची टक्केवारी, उमेदवाराची मराठी व इंग्रजी लघुलेखनाची गती तसेच मराठी व इंग्रजी टंकलेखनाची गती एकत्रित करुन त्यानुसार निवडयादी तयार करण्यात येईल. माध्यमिक शालांत परीक्षा उमेदवार दुस-या प्रयत्नात उत्तीर्ण झाला असल्यास त्या उमेदवाराने सदर परीक्षेत प्राप्त केलेल्या गुणांमधून 10 गुण वजा करण्यात येतील. तिस-या प्रयत्नात उत्तीर्ण झाला असल्यास सदर परीक्षेतील प्राप्त केलेल्या एकूण गुणांमधून 20 गुण वजा करण्यात येतील व त्यानुसार टक्केवारीचे परिगणन करुन सुधारीत टक्केवारी विचारात घेण्यात येईल. तीनपेक्षा अधिक प्रयत्नात शालांत परीक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना भरतीसाठी अपात्र ठरविण्यात येईल. समान गुणसंख्या असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत शासन प्रमाणपत्रानुसार मराठी लघुलेखनाची जास्त गती असलेल्या व ती ही समान झाल्यास इंग्रजी लघुलेखनाची जास्त गती असलेल्या उमेदवारास प्राधान्यक्रम देण्यात येईल व तीही समान असल्यास वयाने जेष्ठ असलेल्या उमेदवारास प्राधान्यक्रम देण्यात येईल. निवड झालेल्या उमेदवारांच्या प्रवर्गनिहाय स्वतंत्र निवड याद्या तयार केल्या जातील.

**उमेदवाराने भरतीसाठी उपस्थित राहण्याचे ठिकाण, दिवस व वेळ :-**

सदर पदाच्या विहित अर्हता / अटी पूर्ण करणाऱ्या इच्छुक उमेदवारांनी खालील वेळापत्रकाप्रमाणे **नागरी प्रशिक्षण संस्था व संशोधन केंद्र, बृहन्मुंबई महानगरपालिका, संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या मागे, अभिनव नगर, बोरीवली (पूर्व), मुंबई – 400066 [बोरीवली (पूर्व) रेल्वे स्थानकापासून बस क्र.299]** या ठिकाणी भरतीसाठी उपस्थित रहावे.

| अ. क्र. | प्रवर्ग (समांतर आरक्षणासह) | वैयक्तिक माहितीपत्र (Biodata) व मूळ प्रमाणपत्रासह भरतीसाठी उपस्थित राहण्याचा | | अर्हताप्राप्त उमेदवारांची मराठी व इंग्रजी लघुलेखन व टंकलेखनाची संगणकावर घेण्यात येणारी व्यावसायिक चाचणी | |
|---|---|---|---|---|---|
| | | दिनांक | वेळ | दिनांक | वेळ |
| 1. | अनुसूचित जाती | 09.04.2010 | सकाळी 9.00 ते दुपारी 1.00 | 10.04.2010 | सकाळी 8.00 वाजता |
| | विमुक्त जाती (अ) | | | | |
| | भटक्या जमाती (ब) | | | | |
| | भटक्या जमाती (क) | | | | |
| | भटक्या जमाती (ड) | | | | |
| 2 | अनुसूचित जमाती | 10.04.2010 | सकाळी 9.00 ते दुपारी 1.00 | 11.04.2010 | सकाळी 8.00 वाजता |
| | विशेष मागासप्रवर्ग | | | | |
| | इतर मागासवर्ग | | | | |
| | खुला प्रवर्ग | | | | |

भरतीसाठी वर नमूद केलेल्या दिवशी व वेळेपर्यंत उपस्थित असलेल्या उमेदवारांना भरती स्थळाच्या आवारात प्रवेश दिला जाईल. त्यानंतर उपस्थित होणा-या उमेदवारांना भरती स्थळाच्या आवारात भरतीसाठी प्रवेश दिला जाणार नाही..

**<u>सर्वसाधारण अटी</u> :-**

1) रिक्त पदांच्या उपलब्धतेनुसार आणि आवश्यकतेनुसार नेमणूका करण्यात येतील.

2) जाहिरातीमध्ये दिलेल्या पदांची संख्या व अनुशेष बदलण्यासापेक्ष आहे.

3) निवडयादी कोणत्याही वेळी पूर्वसूचना न देता रद्द करण्याचे अधिकार बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्तांना आहेत.

4) भरतीसाठी हजर रहावयाच्या वेळापत्रकात आवश्यकता भासल्यास योग्य ते बदल प्रशासनकडून करण्यात येतील. तसेच आवश्यकता भासल्यास भरती प्रक्रिया महापालिका प्रशासनाकडून कधीही थांबविली किंवा पुढे ढकलली जाऊ शकते.

5) वैयक्तिक माहितीपत्र (BIO DATA) विहित नमुन्यात स्वहस्ताक्षरात, सर्व दृष्टीने पूर्ण असावे. विहित नमुन्यामध्ये नसलेले व अपूर्ण माहितीपत्र विचारात घेतले जाणार नाही.

6) अगोदरच बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सेवेत असलेल्या एखादया कर्मचाऱ्याला भरतीकरिता यावयाचे असेल तर त्याने/तिने त्याच्या/तिच्या खातेप्रमुखांचे नाहरकत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

7) अलिकडच्या काळात काढलेले पारपत्र आकारातील उमेदवाराचे छायाचित्र त्याच्या स्वाक्षरीसह माहितीपत्रावर नमूद केलेल्या ठिकाणी चिकटवावे. त्याच छायाचित्राच्या चार अतिरिक्त प्रती पुढील निवड प्रक्रीयेसाठी उमेदवाराजवळ ठेवणे आवश्यक आहे.

8) माहितीपत्रासाठी वापरण्यात येणारे कागद चांगल्या प्रतीचे (छायांकित प्रतीसाठी वापरण्यात येणाऱ्या) ए-4 आकारातील असावे.

9) उमेदवारांनी स्वत: निश्चित करावयाचे आहे की ते आवेदित पदांच्या सर्व अर्हता व अटी पूर्ण करतात. उमेदवार विहित अर्हता व अटी पूर्ण करीत नसल्याचे कोणत्याही क्षणी निर्दशनास आल्यास त्याची उमेदवारी रद्द करण्यात येईल, नेमणुक झाली असल्यास सेवेतून कमी करण्यात येईल.

10) पत्रव्यवहाराचा पत्ता सुस्पष्ट व पूर्ण असावा. (पोस्टल पिनकोडसह)

11) इतर राज्यातून महाराष्ट्र राज्यात स्थलांतरीत झालेल्या मागासवर्गीय उमेदवारांचा आरक्षित पदाकरिता विचार केला जाणार नाही .

12) उमेदवारांनी भरतीच्या दिवशी खालील मूळ प्रमाणपत्रे आणि त्यांची प्रत्येकी एक साक्षांकीत केलेली छायांकीत प्रत (Attested Xerox Copy) सादर करणे आवश्यक आहे.

(ए) शाळा सोडल्याचा दाखला/जन्मदाखला /अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate)

(बी) माध्यमिक शालांत परीक्षा (एस.एस.सी) यांच्या गुणपत्रिका व उत्तीर्णतेची प्रमाणपत्रे (Marksheets & Passing Certificates)

(सी) एस.एस.सी परीक्षा एकापेक्षा अधिक प्रयत्नात उत्तीर्ण झालेली असल्यास प्रत्येक प्रयत्नाची गुणपत्रिका व एकूण प्रयत्नांचे प्रमाणपत्र.

(डी) मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत सक्षम प्राधिका-याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र, असल्यास जातवैधता प्रमाणपत्र आणि असल्यास अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळून अन्य मागासवर्गीय उमेदवारांच्याबाबतीत ते उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे नवीनतम (Latest) प्रमाणपत्र.

(इ) महिला आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणारे खुल्या प्रवर्गातील स्त्री उमेदवार व खेळाडूंसाठी असलेल्या आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणारे खुल्या प्रवर्गातील स्त्री व पुरुष उमेदवार यांच्याबाबतीत ते प्रगत व उन्नत गटात मोडत नसल्याबाबतचे नवीनतम (Latest) प्रमाणपत्र.

(एफ) उमेदवार सरकारी, निमसरकारी किंवा खाजगी नोकरीत असल्यास नियोक्त्याचे (Employer's) प्रमाणपत्र.

(जी) उमेदवार माजी सैनिक असल्यास विमुक्ती प्रमाणपत्र (Discharge Certificate).

(एच) उमेदवार मुंबई महानगरपालिका प्रकल्पांतर्गत बाधित (प्रकल्पग्रस्त) असल्यास त्याबाबतचे सक्षम अधिका-याचे प्रमाणपत्र.

(आय) विवाहीत महिला उमेदवारांच्याबाबतीत विवाह नोंदणी प्रमाणपत्र (Marriage Registration Certificate)/नावात बदल झाल्याबाबतचे राजपत्र (Gazette).

(जे) जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयात नाव नोंदणी केली असल्यास त्याबाबतचे प्रमाणपत्र (Employment Exchange Card).

(के) अपंग उमेदवारांच्या बाबतीत किमान 40 टक्के अपंगत्व असल्याबाबतचे सक्षम प्राधिका-यांनी दिलेले प्रमाणपत्र.

13) उमेदवाराला कोणत्याही न्यायालयाने नैतिक अध:पतन किंवा फौजदारी स्वरुपाच्या खटल्यात शिक्षा केली असल्यास वा उमेदवाराविरुध्द पोलिस चौकशी /न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असल्यास / शिक्षा झालेली असल्यास, उमेदवाराने त्याबाबतचा तपशील देणे आवश्यक आहे.

14) निवड झालेल्या उमेदवाराची संबंधीत पदावर नियुक्ती करण्यापूर्वी सदर पदाच्या 1 महिन्याच्या वेतनाएवढी रोख रक्कम अनामत म्हणून भरावी लागेल किंवा तशा अर्थाचे (आशयाचे) बंधपत्र (Bond) सादर करावे लागेल.

15) निवड झालेल्या उमेदवारांची मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील कोणत्याही कार्यालयात नियुक्ती करण्यात येईल व त्यांची सेवा महापालिकेच्या कोणत्याही कार्यालयात बदली योग्य असेल. तसेच निवड झालेल्या उमेदवारांना आवश्यकतेनुसार पाळयांमध्येही (Shift Duties) काम करावे लागेल.

16) निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चूकीची माहिती/प्रमाणपत्रे/कागदपत्रे सादर केल्याचे किंवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रद्दबातल करण्यात येईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता त्यांची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

17) जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयात नाव नोंदणी केली असल्यास त्याबाबतच्या प्रमाणपत्राची साक्षांकित छायाप्रत आणावी.

18) निवड झालेल्या उमेदवाराला नियुक्तीनंतर मुंबई महानगरपालिका (सेवा) नियम, 1989 तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका सेवा (वर्तणूक) नियम, 1999 लागू होतील. तसेच शासन निर्णय

क्र.अंनियो /1005/126/सेवा-4 दि.31.10.2005 अन्वये नवीन 'परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना' लागू होईल.

19) सदर भरती अंतर्गत नियुक्ती तीन वर्षाच्या परिविक्षाधीन कालावधीसाठी असेल व तीन वर्षानंतरचे सेवा सातत्य उमेदवाराच्या परिविक्षाधीन कालावधीतील कामगिरीवर अवलंबून असेल.

20) वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड) या प्रवर्गाकरिता विहित केलेले आरक्षण त्या त्या प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास अंतर्गत परिवतर्नीय आहे.

21) अ.जा. आणि अ.ज. प्रवर्गातील उमेदवार वगळता अन्य मागास प्रवर्गातील उमेदवारांनी ते उन्नत आणि प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे सक्षम प्राधिकाऱ्याचे नविनतम प्रमाणपत्र नेमणुकीच्या पूर्वी सादर करणे आवश्यक आहे.

22) महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने निर्गमित केलेल्या शासन परिपत्रक क्र.बीसीसी/2009/प्र.क्र.291/09/16-ब दि.5.11.09 नुसार मागासवर्गीयांच्या आरक्षित पदावर निवड झालेल्या मागासवर्गीय उमेदवाराने त्याचे जातवैधता प्रमाणपत्र नियुक्तीपूर्वी सादर करणे आवश्यक आहे.

23) अपंग उमेदवाराने किमान 40% अपंगत्व असल्याबाबतचे सक्षम प्राधिकाऱ्यांनी दिलेले प्रमाणपत्र व त्याची प्रमाणीत प्रत सोबत आणावी.

24) निवड झालेल्या उमेदवाराविरुध्द कोणताही गुन्हा नोंदविलेला नाही अथवा सिध्द झालेला नाही असे चारित्र्य प्रमाणपत्र संबंधित पोलीस स्टेशनकडून प्राप्त झाल्यानंतरच त्याची सदर पदावर नेमणूक केली जाईल.

25) उमेदवारांना भरतीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

26) महिला आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणारे खुल्या प्रवर्गातील स्त्री उमेदवार व खेळाडूंसाठी असलेल्या आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणारे खुल्या प्रवर्गातील स्त्री व पुरुष उमेदवार यांनी ते प्रगत व उन्नत गटात मोडत नसल्याबाबतचे नवीनतम प्रमाणपत्र (Latest Non-Creamy Layer Certificate) भरती मोहिमेच्या दिवशीच सादर करणे आवश्यक राहील.

27) विवाहीत महिला उमेदवारांनी विवाह नोंदणी प्रमाणपत्र (Marriage Registration Certificate) / नावात बदल झाल्याबाबतचे राजपत्र (Gazette) यांच्या मूळ प्रती सोबत आणणे आवश्यक आहे. नसल्यास, विवाहापूर्वीच्या नावाने माहितीपत्र (BIO-DATA) भरु शकतात.

28) शासकीय सक्षम प्राधिका-यांकडून किमान 40% अपंगत्व असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर केलेल्या व निवड झालेल्या अपंग उमेदवारांना मुंबई महानगरपालिकेच्या वैद्यकीय मंडळाकडे अपंगत्वाच्या टक्केवारीची प्रत्यक्ष खातरजमा करण्यासाठी पाठविले जाईल व मुंबई महानगरपालिका वैद्यकीय मंडळाने सदर अपंग उमेदवार सदर पदाचे कर्तव्य बजावण्यास अपंगत्वाच्या दृष्टीकोनातून शारिरीकदृष्टया पात्र ठरविल्यानंतरच त्यास प्रत्यक्ष नेमणूक देण्यात येईल.

**विशेष सूचना :**

1. **यापूर्वी संबंधित कार्यालयात वा अन्य ठिकाणी सादर केलेले/प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. तसेच बृहन्मुंबईमहानगरपालिकेने कोणत्याही व्यक्तीला व इतर दुसऱ्या संस्थेला अर्ज विकणे, स्विकारणे इत्यादींचा अधिकार दिलेला नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.**
2. **सेवायोजन कार्यालय/प्रकल्प अधिकारी यांच्याकडे नोंदणी केलेल्या उमेदवारांनी देखील या जाहिरातीनुसार आवश्यक त्या प्रमाणपत्राच्या मूळ/साक्षांकित प्रतींसह/वैयक्तिक माहितीसह हजर राहणे आवश्यक आहे.**
3. **जर एखाद्या उमेदवाराने भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुचित माध्यमांचा अवलंब केल्याचे किंवा तोतया व्यक्तींची व्यवस्था केल्याचे आढळल्यास त्याला निवडीतून अपात्र ठरविण्यात येईल.**

4. **मध्यस्थ/ठक/मुंबई महानगरपालिकेत संबंध असल्याचे भासविणाऱ्या व्यक्ती यांच्या गैर मार्गाने नोकरी मिळवून देण्याच्या आश्वासनापासून  सावध रहावे.**
5. सदर जाहिरात बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या http://portal.mcgm.gov.in या  वेबसाईटवर उपलब्ध  आहे.

सही/-
उप आयुक्त (म.भ.प्रा.)

# बृहन्मुंबई महानगरपालिका

## वैयक्तिक माहितीपत्र (BIO-DATA)

उमेदवाराने त्याचे अलिकडेच काढलेले पारपत्र आकाराचे छायाचित्र लावून फोटोवर स्वाक्षरी करावी.
2.5 से.मी. X 3 से.मी.

1) (अ) संपूर्ण नांव (आडनाव प्रथम) मराठीत) :

(ब) वडिलांचे/पतीचे संपूर्ण नाव :

(क) विवाहीत महिलांच्या बाबतीत त्यांचे विवाहापूर्वीचे नाव :

2) पत्ता :

3) लिंग पुरुष ☐ स्त्री ☐

4) अ) प्रवर्ग: जात: पोटजात:

ब) समांतर आरक्षण : महिला ☐ माजी सैनिक ☐ प्रकल्पग्रस्तांसाठी ☐

भूकंपग्रस्त ☐ अपंग ☐ खेळाडूंसाठ ☐

क) उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र : आहे / नाही

ड) जात वैधता प्रमाणपत्र : आहे / नाही

इ) स्त्री उमेदवार महिला आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिते का ? होय/नाही

5) उमेदवार अपंग असल्यास अपंगत्वाचा प्रकार : (अ) अंशत: अंध ☐
(ब) अंशत: कर्णबधीर ☐
(क) अस्थिव्यंग (OL / BL) ☐

6) अ) जन्मदिनांक :- दिनांक महिना वर्ष

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

ब) दिनांक 01.04.2010 रोजी असलेले वय: ---------- वर्षे-----------महिने--------दिवस

7) शैक्षणिक अर्हता : -

| शैक्षणिक अर्हता | शालांत परीक्षा मंडळ/विद्यापीठाचे नाव | एकूण गुण/पैकी | टक्केवारी | शालांत परीक्षेतील गुण | | उमेदवार किती प्रयत्नात परीक्षा उत्तीर्ण झाला |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | मराठी | इंग्रजी | |
| | | | | | | |
| | | | | | | |

(ब) इंग्रजी लघुलेखन : ----- श.प्र.मि. मराठी लघुलेखन : ----- श.प्र.मि.
इंग्रजी टंकलेखन : ----- श.प्र.मि. मराठी टंकलेखन : ----- श.प्र.मि
लघुलेखनाचे व टंकलेखनाचे शासन व्यावसायिक प्रमाणपत्र आवश्यक.

क) संगणक विषयक ज्ञान : एम.एस.सी.आय.टी. : ------------------------
किंवा शासनाने विहित केलेले संगणकविषयक अभ्यासक्रम --------------------

8) स्थानिक पोलीस स्टेशनचा पत्ता : --------------------------------------

9) (i) उंची ---- फूट ---- इंच (ii) वजन ----- (iii) शरीराची ठेवण : किरकोळ/ मध्यम/ सृदृढ

(iv) वर्ण ---------- (v) नेत्र वर्ण --------- (vi) वैयक्तिक खूण -------------------

★ (लागू असलेल्या चौकोनात अशी खूण करावी)

आपला/आपली विश्वासू,

दिनांक : अर्जदाराची सही

ठिकाण : (अर्जदाराचे नाव)